MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

## आष्टीत पतीच्या त्रासाला कंटाळून पत्नीची आत्महत्या

### आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीविरुद्ध गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

गेवराई : पतीच्या जाचाला कंटाळून विवाहित महिलेने विहिरीमध्ये उडी मारून आत्महत्या केली आहे. ही घटना बीड जिल्ह्यातील आष्टी येथे घडली आहे. रेखा ज्ञानेश्वर डुकरे असे आत्महत्या केलेल्या विवाहित महिलेचे नाव आहे. याप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती ज्ञानेश्वर डुकरे हे रोज दारू पिऊन येवून मयत पत्नीच्या चारीत्र्यावर संशय घेऊन सतत त्रास देऊन तिला मारहाण करून धमकी देत होता. या होणाऱ्या त्रासाला कंटाळून विवाहित महिलेने विहिरीमध्ये उडी मारून आत्महत्या केली असल्याची घटना घडली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, पती ज्ञानेश्वर डुकरे यांना दारूचे व्यसन आहे. त्यामुळे पती-पत्नी दोघांमध्ये भांडण सुरू होते. दि.०५ रोजी दारू पिऊन दारूच्या नशेत पतीने त्याच्या पत्नीला जबर मारहाण केली होती. त्यानंतर पुन्हा दुसरा दिवशी देखील दारूच्या नशेत मारहाण केली होती. पती सतत चारित्र्यावर संशय घेत पत्नीला मारहाण करीत होता. तो नेहमी तिच्या चारित्र्यावर संशय घेत दररोज दारू पिऊन दारूच्या नशेत मारहाण करून शिवीगाळ करत धमकी देत होता. या होणाऱ्या सततच्या त्रासाला कंटाळून पत्नीने विहिरीमध्ये उडी मारून आत्महत्या केली आहे. आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी मुलाने दिलेल्या तक्रारीवरून ज्ञानेश्वर डुकरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३५१ | गुरूवार दि.१२ सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -351 | THURSDAY DT.12 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4


## प्रियंका खेडकर यांच्या लोकप्रियतेचा धसका आमदार लक्ष्मण पवारांनी घेतला

# बीडच्या घोंगडी बैठकीमुळे गेवराईचं राजकारण तापलं ?

बीड/प्रतिनिधी

मराठा ओबीसी वादाची ठिणगी अख्ख्या महाराष्ट्रामध्ये पडलेली असतानाच आरोप प्रत्यारोपाची भाषा करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या पायाखालची वाळू सध्या सरकलेली आहे.याच राजकीय समीकरणाचे गणित बदललेले आहे. यामध्ये सत्तेमध्ये एक नंबर असलेला भारत देशातील एकमेव पक्ष म्हणजे भारतीय जनता पार्टी आहे. महाराष्ट्रामध्ये उद्धव ठाकरे शरद पवार आणि काँग्रेसचे सरकार असताना यावेळी भाजपने अजित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरद पवार यांच्यापासून पडून स्वतंत्र चूल मांडण्यास सांगितले किंवा दबा तंत्र वापरून भाजपने महाराष्ट्रातील सत्ता परिवर्तन केले यामध्ये उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री पदाची खुर्ची सोडावी लागली आहे.





**याचाच एक भाग म्हणून बीड जिल्ह्यामध्ये सहा मतदारसंघांमध्ये महायुतीला पाच आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा एक आमदार आहे .यामध्ये बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी शरद पवारांसोबत राहण्यास पसंत दिली आहे. तर माजलगाव मतदार संघाचे माजी मंत्री आमदार प्रकाश सोळंकेनी अजित पवार यांच्यासोबत जाणे पसंत केले आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे बाळासाहेब आजबे यांनी हे अजित पवार यांच्या सोबत गेले बीडचे पालकमंत्री व परळीचे विद्यमान आमदार धनंजय मुंडे यांनी अजित दादा पवार यांच्या सत्ता परिवर्तनामध्ये मोठी बाजू निभावत महाराष्ट्रामध्ये सत्ता परिवर्तन करण्यास कारणीभूत ठरलेले धनंजय मुंडे हे सुद्धा आज अजित दादा पवार यांच्या सोबत आहेत. तर यावेळी महायुतीच्या उमेदवार केज मतदार संघाच्या जागी राखीव मतदार आहे. याच आमदार नमिता ताई मुंदडा या पंकजाताई मुंडे यांच्या खंदे समर्थक मानले जातात तर गेवराई मधून आमदार लक्ष्मण पवार हे विद्यमान महायुती भाजपचे आमदार आहेत.**

महायुतीचं सरकार आलं आणि आमदार लक्ष्मण पवार यांना पालकमंत्री होण्याचे स्वप्न पाहू लागले परंतु या अगोदर तत्कालीन पालकमंत्री अतूल सावे यांच्यानंतर आपल्याला पालकमंत्री पद मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु लक्ष्मण पवार यांना पक्षश्रेष्ठींनी बीड जिल्ह्यातील बहीण भावांच्या राजकारणामुळे डावल याची चर्चा गेवराई मतदार संघातील आमदार लक्ष्मण पवार यांच्या कार्यकर्त्यांमध्ये व जनतेमध्ये चालूआहे .पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्या राजकारणाला कंटाळून व देवेंद्र फडणवीस यांची कास धरत आमदार लक्ष्मण पवार यांनी पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांच्यासोबत राजकीय वैर अंधारातून घेतल्याची चर्चाही सध्या गेवराई मतदार संघामध्ये आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातील राजकारणामध्ये मराठा ओबीसी वादामध्ये मनोज जरांगे पाटील प्रा. लक्ष्मण हाके जो उमेदवार देतील त्याच उमेदवारांमध्ये खरी लढत होणार आहे मनोज जरांगे प्रा. लक्ष्मण हाके दोघांमुळे गेवराई राजकारण समिकाना बदलणार आहेत. याचाच धसका म्हणजेच अर्थात भावी आमदार म्हणून बीड जिल्ह्यामध्ये चर्चेला उधाण आलेल्या चकलांब्याच्या सरपंच प्रियांका शिवप्रसाद खेडकर यांच्या नावाला गेवराई मतदार संघामध्ये १८ पगड जातीकडून ही पसंती मिळत असतानाच मात्र आता आमदार लक्ष्मण पवार हे भाजप पक्ष सोडण्याच्या तयारीत आहेत. अशी चर्चा गेवराई मतदार संघात आहे. तर भाजपच्या पक्ष कार्यालयात गेवराई मतदार संघातील गेवराई शहरात असलेले कार्यालय मध्ये सध्या शुकशुकाटाचे वातावरण आहे. तर आमदार लक्ष्मण अण्णा सांगतील तोच आमचा पक्ष असेल अशी ही चर्चा आ. लक्ष्मण पवार यांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. परंतु आमदार लक्ष्मण पवार हे भाजप सोडणार आहेत. ही गोष्ट मात्र निश्चित आहे. तर यावेळी मात्र आमदार लक्ष्मण पवाराना यावेळी मराठा ओबीसीचा फटका बसण्या अगोदरच आमदार आमदार लक्ष्मण पवारानी येणाऱ्या विधानसभेमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये जाण्याची पसंती अंधारातून विश्वासू या कार्यकर्त्यां सोबत बैठकावर चर्चा करून आमदार लक्ष्मण पवार हे निर्णय घेण्याच्या तयारीत आहेत. यामध्ये गेल्या २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचा पराभव झालेला आहे .याच गेवराई मतदार संघातून पंकजा मुंडे यांच्या विरोधामध्ये आमदार लक्ष्मण पवार यांच्या समर्थकांनी बजरंग सोनवणे याचे काम केल्यामुळे पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांचा रोष वाढलेला आहे.अशी चर्चा मतदार संघात ऐकायला मिळत आहे.परंतु आमदार लक्ष्मण पवार व पंकजाताई मुंडे यांचा राजकीय मतभेद हे अनेक दिवसांपासून चालू आहे. परंतु यावेळी आता आमदार लक्ष्मण पवार यांना मात्र यावेळी आता शरद पवारांचे पाय धरण्याची वेळ आली आहे.अशी ही मतदार संघात चर्चा आहे.परंतु आमदार लक्ष्मण पवार यांनी आता गुत्तेदारांकडूनच मतदान घ्यावे गुत्तेदार पोसण्यात आमदार लक्ष्मण पवार यांनी खूप प्रयत्न केलेले आहेत. अनेक बोगस काम या मतदारसंघांमध्ये झालेले आहेत. आमदार लक्ष्मण पवार यांच्या पायाखालची वाळू सरकलेली आहे. तर आमदार लक्ष्मण पवार यांचे अनेक कार्यकर्ते मोठ मोठे दोन नंबरचे धंदे चालवतात यामध्ये दारू पत्त्याचे क्लब गुटख्या अवैध वाळू सहप्रशासनावरती दबाव आणून आमदार लक्ष्मण पवार हे आपले राजकीय वरदहस्त लाभलेल्या दोन नंबर वाल्यांच्या पाठीशी उभा राहून आपला राजकीय फायदा करून घेत असल्यामुळे आमदार लक्ष्मण पवारना मात्र आता वेगळी चूल मांडून वेगळ्या पक्षांमध्ये जाण्याची वेळ आलेली आहे.परंतु आमदार लक्ष्मण पवार यांना यावेळी गेवराई मतदार संघातील जनता पाडणार आहे. कारण पंडित पवार हे एकमेकांचे संगेसोयरे नातेवाईक आहेत. गेल्या ७५ वर्षांमध्ये पंडित पवारांनी गेवराई मतदार संघाचा का विकास केला अशी चर्चा आहे. पण गेवराई मतदार संघात असतानाच मात्र आता याच २०२४ च्या विधानसभेमध्ये आमदार लक्ष्मण पवार यांना लोकांची पसंती मिळत नसल्यामुळे व राजकीय समीकरण जुळवून घेत जातीच्या आधारावरती आमदार लक्ष्मण पवार यांना आता शरद पवारांची पाय धरण्याची वेळ आलेली आहे.त्यामुळे शरद पवार हे त्यांना प्रवेश देतात का हे पाहणे गरजेचे आहे. परंतु लक्ष्मण पवार यांच्या गेल्या दहा वर्षातील विकासामध्ये आणि वागणुकीमुळे गेवराई मतदार संघातील वेगळी चर्चा चालू आहे. लक्ष्मण पवार यांनी पंकजाताई मुंडे यांच्या २०२४ विधानसभेच्या अनुषंगाने वेगवेगळे पंकजा मुंडे यांच्या जाहीर सभा लावल्या होत्या त्या सभेला अनेकदा आमदार लक्ष्मण पवार यांनी पंकजा मुंडे यांची भेट घेणे टाळले आहे हे सर्व गेवराई मतदार संघातील जनतेला माहित आहे. पंकजा मुंडे यांच्या विरोधामध्ये आमदार लक्ष्मण पवार यांच्या टीमने काम केल्यामुळे आता आमदार लक्ष्मण पवार यांची पक्षांमध्ये कमी झाली आहे.तर भारतीय जनता पार्टीला सोडून आपल्याला पुढील गेवराई चा आमदार व्हायचे आहे .म्हणून शरद पवार यांच्या गटांमध्ये जाण्याचा मार्ग लक्ष्मण पवार यांना उरलेला आहे.व त्या मार्गावरती जाण्यासाठी त्यांच्या पक्ष कार्यालयातील वातावरण बदललेला आहे व पक्षांतराच्या संबंधित चर्चेला उदान आलेले आहेत. तर गेवराई मतदार संघामध्ये सध्या होत असलेल्या मराठा ओबीसी वादामध्ये आमदार लक्ष्मण पवार यांना फटका बसणार आहे. कारण ओबीसी मतदान ही गेवराई तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात आहे. तर गेवराई मतदान होत असताना ओबीसी चे नेते प्रा.लक्ष्मण हाके हे आता कोण उमेदवार देतात. त्यामुळे जर त्यांनी प्रियंका खेडकर यांना उमेदवारी दिली तर त्यांना मोठा तगडा उमेदवार मिळणार आहे. कारण पंडित पवार यांच्या राजकारणामध्ये दुसरा कोणीही उमेदवार टिकू शकणार नसल्यामुळे लक्ष्मण पवार आता अस्वस्थ झालेले आहेत.लक्ष्मण पवार यांच्या पायाखालची वाळू सरकल्यामुळे मात्र आता लक्ष्मण पवार यांचे अनेक उपस्थिती समर्थक हे प्रियांका शिवप्रसाद खेडकर यांच्या संपर्कात आहेत. व येणाऱ्या विधानसभेमध्ये प्रियंका खेडकर यांना गेवराई मतदार संघातील जनता विधानसभेमध्ये पाठविणार असल्याची मोठ्या प्रमाणात चर्चा बोलण्यात येत आहे.

**मनोज जरांगे प्रा.लक्ष्मण हाके भोवती गेवराईचे राजकीय समीकरणे बदलणार ?**
**मनोज जरांगे प्रा.लक्ष्मण हाके उमेदवारांमध्ये खरी टक्कर होणार गेवराई मतदार संघामध्ये चर्चेला उदान?**
**गेवराई मतदार संघामध्ये आमदार लक्ष्मण पवारानी ९०% विकास हा गुत्तेदार पोचण्यातचं केला.**
**आमदार लक्ष्मण पवार यांच्या विरोधात गेवराईतील जनतेकडून मतदार संघातील कामाचा रोष कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार असल्याचीही मतदारसंघातील लोकांमध्ये चर्चा?**
**प्रियंका शिवप्रसाद खेडकर नावाला गेवराई मतदार संघात पसंती.**
**आमदार लक्ष्मण पवाराला चकलांबा उमापूर ने मोठे केलं.?**
**गेवराईचं राजकारणात ओबीसी मराठा वादाचा मोठा भडका.?**
**गेवराई मतदार संघात प्रियंका शिवप्रसाद खेडकरांनी अनेक काम दर्जेदार केली तेही स्वकर्तृत्वातून.**
**मनोज जरांगे पाटील फॅक्ट गेवराई मतदार संघात जास्त प्रमाणात लोकसभेलाचं चालला. विधानसभेला ओबीसी फॅक्ट चालणार?**
**ओबीसी मराठा वादाचा फटका आमदार लक्ष्मण पवारांना बसणार?**
**प्रियंका शिवप्रसाद खेडकरांना अठरापगड जातीची पसंती.**
**गेवराई मतदार संघात आमदार लक्ष्मण पवारांच्या वागणुकीमुळे मतदारांची मन दुखावली?**
**काही दिवसांपूर्वी गेवराई मतदार संघात झालेल्या ओबीसी मेळाव्याच्या वातावरणातच प्रियांका शिवप्रसाद खेडकर यांची लोकप्रियता वाढली.**
**गेवराई तालुक्यात जर जातीचे समीकरण चाललं तर प्रियंका खेडकर यांचा पारड जड.**
**गेवराईची जनता आता चौथा पर्याय शोधण्याच्या तयारीत. तो पर्याय म्हणजे प्रियंका शिव खेडकरच.**

## सवाल पॉयझन रिमोव्हबल मशीन चा काय उपयोग सिव्हिल सर्जन डॉ अशोक बडे उत्तर द्या

### आमदार खासदार नगरसेवक लोकप्रतिनिधी पत्रकार यांच्या कोणाचाही डॉ.अशोक बडे फोन उचलत नाहीत

बीड /प्रतिनिधी

कोविड कार्यकाळातले अनेक व्हेंटिलेटर मॉनिटर सह इतर साहित्य धुळ खात पडलेले आहे जिल्हा रुग्णालयामध्ये सर्पदंश विषारी औषध प्राशन केलेले अनेक पेशंटला जीव गमावा लागत आहे. आय सी यू मध्ये जागा कमी पडत असल्यामुळे डॉअशोक बडे यांनी जिल्हा रुग्णालयातील वार्ड क्रमांक ९ जुना बाल विभाग विद्यमान आयुष्य सि यू च्यावरील सात नंबर वार्ड मध्ये आहे. त्याच्यावरती एम टी पी वार्ड आहे.तर नऊ नंबरचा बाळरोग कक्ष हा धुळखात पडलेला आहे.त्या ठिकाणी आयसीयू तयार करावे सर्व साहित्य असताना या ठिकाणी आयसीयू का तयार करत नाहीत डॉअशोक बडे यांनी जिल्हा रुग्णालयाकडे दुर्लक्ष केल्यामुळे अनेक लोकांचे प्राण जात आहेत.बीड जिल्हा रुग्णालय सांभाळण्यासाठी अशोक बडे हे सक्षम नसल्याचे स्पष्ट होत आहे .डॉ अशोक बडे यांनी मात्र आता तरी नवीन आयसू यू चे वॉर्ड चालू करून रुग्णांचे प्राण वाचवावेत तसेच काल एका महिलेचा मृत्यू झाल्यानंतर संतप्त महिलेंच्या नातेवाईकांनी जिल्हा शल्य चिकित्सक असलेले डॉ अशोक बडे यांच्या केबिनमध्ये मृतदेह नेऊन ठेवला होता. व त्या ठिकाणी ठिय्या आंदोलन करण्यात आले.यावेळी डीपीआईचे अजिंक्य चांदणे यांनी जिल्हा रुग्णालयावरती ताशेरे ओढले आहेत. जिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णांची हेरसाण होत असतानाच आता मात्र आणखीन एक रुग्ण




रात्री तीनच्या दरम्यान आय सी यू मध्ये जागा नसल्यामुळे मृत्यू पावला आहे वडवणी तालुक्यातील चिंचवण या गावचा रहिवासी असलेला हानवते नावाचा रुग्ण वार्ड क्रमांक सहा मध्ये विषारी औषध प्रशासन केलेले म्हणून डमिट झाला होता. जिल्हा रुग्णालयामध्ये मात्र आता रुग्णांची हेडसांड होण्याचे चित्र हे मोठ्या प्रमाणात दिसत आहे .या ठिकाणी जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर हे सर्व जिम्मेदारी विसरून स्वतःच्या खाजगी दवाखान्यामध्ये जास्त बसतात व कॉल दिल्यानंतर सुद्धा डॉक्टर लवकर येत नाहीत त्यामुळे कॉल ची प्रथा रद्द करून आता ज्या जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर यांची ड्युटी आहे त्यांना त्या ठिकाणी बारा तास असेल किंवा २४ तास वेगवेगळ्या शिफ्टमध्ये तळ ठोकून जिल्हा रुग्णालयामध्ये बसून राहणे गरजेचे आहे असाही आदेश डॉक्टर अशोक बडे यांनी काढणे गरजेचे आहे तर यावेळी मात्र आता कोट्यावधी रुपयाचा खर्च करून सात आठ नऊ हे वार्ड क्रमांक आयसीयू मध्ये रूपांतरित केले होते सहा कोटी ५४ लाख रुपये ह्या वॉर्डच्या दुरुस्तीसाठी खर्च केलेले आहेत. या व्हेंटिलेटर बेड व सर्व सुखसुविधा धुळ खात पडलेले असताना मात्र डॉअशोक बडे यांना हे दिसत नाही का डॉअशोक बडे यांनी पुढाकार घेऊन बीड जिल्हा रुग्णालयामध्ये येणाऱ्या अनेक पेशंटचा जीव वाचवून आशीर्वाद घ्यावा अशी मागणी जनतेकडून होत आहे. जर डॉ अशोक बडे यांनी या प्रकरणी विद्यमान असलेल्या धूळ खात पडलेल्या इमारतीमध्ये वार्ड क्रमांक ९ जुना बाळ रोग कक्ष या ठिकाणी आयुष्य उभा नाही. केला तर आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या दारामध्ये ठिय्या आंदोलन बीड जिल्ह्यातील अनेक सामाजिक संघटना करणार आहेत. तर यावेळी मात्र आता अशोक बडेनी आता तरी वार्ड क्रमांक नऊ मध्ये आयसीयू चालू करून त्या ठिकाणी धूळ खात पडलेले साहित्य हे रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी प्रयत्न करावे. व त्या ठिकाणी जिल्हा रुग्णालयामध्ये येणाऱ्या डॉक्टरांना व कर्मचाऱ्यांना अभय देऊ नये.या ठिकाणी डॉ अशोक बडे यांनी प्रत्येक वार्डात दररोज दोन वेळा तरी राऊंड घ्यायला पाहिजे

***पॉयझन रिमोव्हबल मशीन चा काय उपयोग डॉ अशोक बडेनी उत्तर द्या कारण डॉअशोक बडे साहेब संबंधित पॉयझन रिमूव्हल नवीन मशीन ची खरेदी केलेली आहे. ही खरेदी केल्यानंतर त्या मशीन चा उपयोग खूप कमी प्रमाणात होतो आयसीयू मधील तज्ञ डॉक्टर व सिस्टर ब्रदर ही मशीन चालू शकतात.मात्र हीच मशीन पुन्हा एकदा जिल्हा रुग्णालयामध्ये नव्याने आयसीयू चालू करून त्या ठिकाणी दुसऱ्या आयसीयूमध्ये ही मशीन उपलब्ध करून द्यावी कारण अनेक लोकांचे प्राण वाचतील म्हणून डॉ अशोक बडे यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.***

जिल्हा रुग्णालयातील सिस्टर ब्रदर मामा मावशी हे चांगलं काम करत आहेत संबंधित डॉक्टरांनी जर त्यांना सहकार्य केलं तर त्या ठिकाणी बीड जिल्हा रुग्णालयाची रुग्णांच्या बाबतीतली जी व्यवस्था आहे ती योग्य पद्धतीने होईल व रुग्णांना दर्जेदार सुविधा व सेवा मिळेल याकडेही डॉक्टर अशोक बळी यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

**सिव्हिल सर्जन डॉ अशोक बडे धुळखात पडलेल्या बिल्डिंग मधील वार्ड क्रमांक नऊ मध्ये आयसीयू चालू करावा.**
**सिव्हिल सर्जन डॉअशोक पडे धुळखात पडून असलेल्या जिल्हा रुग्णालयामध्ये कोट्यावधी रुपयाचे खरेदी केलेले व्हेंटिलेटर मॉनिटर बेडसह अन्य साहित्य उपलब्ध असताना नवीन आयसीयू तयार काय अडचण आहे का**
**आरोग्य मंत्री तानाजी यांचा फोन डॉ अशोक बडे उचलत असतील का.?**
**बीड जिल्हा रुग्णालयामध्ये वॉर्ड मध्ये राऊंड घेत असताना डॉक्टरचा हलगर्जीपणा उशिरा यायचं लवकर निघून जायचं.?**
**जिल्हा रुग्णालयातील सिस्टर ब्रदर मामा मावशी यांचं काम डॉक्टरांपेक्षा शभर पटीने चांगलं सिस्टर ब्रदर मामा मावशी यांचे कौतुक करावं तेवढं कमीच.**
**अनेक वार्डमध्ये सिस्टर ब्रदर मामा मावशी हे रुग्णांची सेवा योग्य पद्धतीने करतात परंतु डॉक्टर त्या ठिकाणी त्यासंबंधित स्टाफला अरेरावीची भाषा वापरतात.?**
**प्रत्येक वार्ड मध्ये आपापल्या खाजगी रुग्णालयामध्ये पेशंट घेऊन जाण्यासाठी म्हणजेच स्वतःच्या दवाखान्यात पेशंट घेऊन जाण्यासाठी डॉक्टरांची रस्सीखेच.**
**जिल्हा रुग्णालयामध्ये पेशंटच्या नातेवाईकांना डॉक्टरांकडून महिला असेल किंवा पुरुष भाषा अरेरावीची अरेतुरेची.**
**वॉर्डमध्ये राऊंड घेत असताना सकाळी आणि संध्याकाळी वेळेचा बंधन राहिलेला नाही.**
**जिल्हा रुग्णालयामध्ये डॉअशोक बडे यांच्या फोन कॉल वर दुसराच डॉक्टर फोन उचलतो.**
**आमदार असेल किंवा खासदार कोणताही लोकप्रतिनिधी आला तरी डॉ अशोक बडेना फोन केला तर दुसऱ्याकडे फॉरवर्ड होतो.**
**प्रत्येक वार्ड मधून संबंधित स्टाफ हा डॉक्टरांना स्टार्ट कॉल देतात**
**कॉलमन कडून डॉक्टर ला कॉल करून बोलावणे ही पद्धत बंद करा.**
**बीड जिल्हा रुग्णालयामध्ये कॉल वर ड्युटीवर असलेले सर्व डॉक्टरांना २४ तास किंवा बारा तास ची शिफ्ट आहे यामध्ये संबंधित डॉक्टरला जिल्हा रुग्णालयात तळठोकून बसणे बंधनकारक करण्याचा लेखी आदेश डॉ अशोक बडे सिव्हिल सर्जन यांनी डॉ अशोक बडेनी काढावा.**
**विद्यमान आयसीयू मध्ये चांगला स्टाफ आहे सर्व सिस्टर ब्रदर हे अनुभवी आहेत. जिल्हा रुग्णालयामध्ये आयसीयू मध्ये दर्जेदार उपचार हा तेथील सिस्टर ब्रदर मामा यांच्यामुळे रुग्णांचे अनेकदा प्राण वाचलेले आहेत.**
**आणखी जुन्या बिल्डिंग मधील जुना बाल कक्ष असलेला वार्ड क्रमांक नऊ मध्ये आयसीयू तात्काळ चालू करून रुग्णांचा जीव वाचवायला पाहिजे डॉ अशोक बडेनी घ्यावा.**

# मराठा आरक्षण उपोषाणकर्त्या राजश्री उंबरे यांची मंत्री अतुल सावे यांनी घेतली भेट.



पाणी पाजून मुंबईत येण्याचे आवाहन..

चर्चेतून लवकरच मार्ग काढू - गृहनिर्माण मंत्री श्री अतुल सावे

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी क्रांती चौकात उपोषणाला बसलेल्या उपोषाणकर्त्या राजश्री उंबरे यांची प्रकृती खालावत आहे. त्यांच्या उपोषणाचा आजचा १० व्या दिवशी राज्याचे गृहनिर्माण आणि इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी बुधवारी त्यांची भेट घेत पाणी पाजत उपोषण सोडण्याचे विनंती केली. यावेळी त्यांनी बोलतांना सांगितले की, लवकरच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या समवेत या संदर्भात बैठक घेऊ तसेच चर्चा करून मार्ग काढण्यात येईल. यासाठी शिष्टमंडळाने आमच्या समवेत मुंबईमध्ये बैठकीत साठी यावे असे आवाहन देखील त्यांनी या प्रसंगी केले.

मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, इडब्ल्यूएस आरक्षण लागू करावे, मराठवाड्यासाठी हैदराबाद गॅझेट लागू करावा यासह आदी २१ मागण्या साठी धर्मवीर संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या प्रदेशाध्यक्ष राजश्री उंबरे यांनी दिनांक २ तारखेपासून क्रांती चौक येथे उपोषण सुरू केले आहे. आज त्यांच्या उपोषणाचा १० दिवस होता. यावेळी मंत्री अतुल सावे यांनी भेट देत सविस्तर चर्चा केली.

# माजलगाव तालुका रिपाईच्या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहा- अविनाश जावळे



माजलगाव : प्रतिनिधी

रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सामाजिक न्याय केंद्रीय राज्यमंत्री मा. ना. रामदासजी आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य शक्तिप्रदर्शन व तिसऱ्यांदा मंत्रिमंडळात समावेश केल्याबद्दल त्यांच्या भव्य सत्काराच्या आयोजनाच्या नियोजनासाठी माजलगाव तालुक्याची बैठक दि. १३ /९ /२०२४ वार शुक्रवार ठिक १२ : ०० वाजता व्यंकटेश हॉटेल येथे करण्यात आले असून तरी सर्व माजलगाव तालुक्यातील शाखाप्रमुख , सर्कल प्रमुख , तालुका कार्यकारणी , शहर कार्यकारीणी व सर्व रिपाई कार्यकर्त्यांनी उपस्थितीत राहावे या बैठकीस मा. पप्पूजी कागदे साहेब , प्रदेश युवक अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष यांचे मार्गदर्शन होणार आहे तसेच राज्यासह देश पातळीवर रामदासजी आठवले साहेब शोषित , पिडीतांच्या न्याय व हक्कांसाठी संघर्ष करीत अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम दलित पँथर पासून आज पर्यंत रिपाईच्या माध्यमातून करीत आहे. उपेक्षितांना न्याय देण्यासाठी व विविध योजनाचा लाभ देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सतत संघर्ष करणारे रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले साहेब तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्रीमंडळात निवड झाल्याबद्दल त्यांचा बीड शहरात येत्या ५ आक्टोंबर रोजी नागरि सत्काराच्या माध्यमातून रिपाईच्या वतीने भव्य शक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे.

यापूर्व तयारीसाठी माजलगाव तालुक्यात ठेवलेल्या बैठकीस तालुक्यातील सर्व रिपाई कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन तालुका अध्यक्ष अविनाश जावळे यांनी केले आहे.



## बिल्डा ग्रामपंचायत हद्दीतील मटपाटी येथील बोलकर वस्तीतील एका गरीब महिलाची दुर्दशा

फुलंब्री तालुक्यातील बिल्डा ग्रामपंचायत हद्दीतील मटपाटी येथील बोलकर वस्तीतील सुनिता सुधाकर बोलकर वय ३५ वर्षीय विधवा महिलेच्या राहत्या घराची भिंत पडली असुन त्यांचे कुटुंब उघड्यावर आले आहे.बोलकर कुटुंब सध्या गरीबी वर मात करत आपला संसार चालवत आहे.या गरीब महिलेला शासकीय योजनेचा अद्याप पर्यंत कोणतीही सुविधा उपलब्ध झाली नाही . सुनिता सुधाकर बोलकर या महिलेने प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल चा अर्ज दाखल केला असता तरी पण ही घरकुल योजना मंजूर झाला नसुन या संदर्भात संबंधित असलेले ग्रामपंचायतीचे सरपंच व उपसरपंच ग्रामसेवक यांनी गरीब विधवा महिलेच्या राहत्या घराची दुरवस्था झाली असून या घराची पाहणी करुन बोलकर कुटुंबीयांना आर्थिक मदत करावी अशी बोलकर कुटुंबीय करत आहे.

# बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने १४ वर्षांखालील खेळाडूंची निवड चाचणी

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धा होणार असून त्यासाठी बीड जिल्हा क्रिकेट असोसएशनतर्फे वर्षांखालील खेळाडूंसाठी जिल्हा संघ निवड चाचणी शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे बुधवारी (दि.११) घेण्यात आली. यावेळी शेकडो खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

प्रमुख अतिथी असलेले बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या खेळाडूंनी राज्य, देश पातळीवर खेळून बीड जिल्ह्याचा नावलौकीक केलेला आहे. बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने खेळाडूंची निवड ही केवळ त्यांचा खेळ पाहूनच केली



जाते. असोसिएशनचा कारभार हा अत्यंत पारदर्शक आहे. बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे नाव महाराष्ट्रातील अग्रस्थानी असलेल्या असोसिएशनच्या यादीत घेतले जाते. यावेळी त्यांनी खेळाडूंना उत्कृष्ट कामगिरी करून संघात स्थान मिळावे अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी नगरसेवक जैतुला खान, शुभम धूत, बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव आमेर सलीम, सदस्य महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, जावेद पाशा, मनोज जोगदंड, सरफराज मोमीन, शेख आरेफ, अतिक कुरेशी, अक्षय नरवडे, शाहरुख पठाण यांच्यासह पदाधिकारी, सदस्य, खेळाडू उपस्थित होते.

# सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते

सिरसमार्ग (प्रतिनिधी)

भाद्रपदात गणपती बाप्पाच्या आगमनानंतर घरोघरी गौराईचे आगमन झाले. तीन दिवस माहेरपणाला आलेल्या या गौरी घरात प्रसन्नतेचे वातावरण घेऊन आल्या आहेत. पहिला दिवस त्यांच्या आगमनाचा दुसरा दिवस त्यांच्या पुजनाचा व पाहणचाराचा आणि तिसरा दिवस त्यांच्या विसर्जनाचा असे एकुण तीन दिवस त्यांचे वास्तव्य घराघरात उत्सह आनंदाचे वातावरण निर्माण करते. दरम्यान माहेरवाशिणीला माहेरची ओढ लावणारा आणि सासुरवाशीणीची लगबग वाढविणारा महालक्ष्मीचा म्हणजेच गौराईचा सण चोहोदुर अतिशय भक्तिभावात आणि आनंदात साजरा होतोय. सोन्याच्या पावलांनी घरोघरी ज्येष्ठा कनिष्ठा गौरींचे आगमन झाले आहे. आज त्यांच्या पूजनाचा दिवस आपल्या आयुष्यात सुख, समृध्दी घेऊन येवो, महालक्ष्मी पूजनाच्या सर्वांना ( शिरसमार्ग उमाप परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा)





नेकनूर (प्रतिनिधी)

मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी गेल्या वर्षभरापासून मराठा योद्धा जरंगे पाटील यांनी आंदोलनाचे हत्यार उपसल्याने येणाऱ्या काही दिवसात मराठ्यांना आरक्षण नाही दिले तर महाराष्ट्रामध्ये विधानसभेसाठी उमेदवार उभे करणार अशी घोषणा केल्याने केज विधानसभेसाठी नेकनुर चे सरपंच अनिता सुंदर लांडगे यांनी ग्रामपंचायत सदस्य यांच्या सह शिष्टमंडळासहित मनोज जरांगे पाटलांची भेट घेऊन केज विधानसभेसाठी मी इच्छुक असल्याचे सांगितले. त्यांच्यासोबत नेकनुर मधील १४ ग्रामपंचायत सदस्य व इतर शेकडो कार्यकर्ते होते.गेल्या वर्षभरापासून मराठा योद्धा सन्माननीय मनोज जरांगे पाटील यांनी मराठ्यांना आरक्षण मिळण्यासाठी अखंडपणे आंदोलनाचा प्रश्न तेवत ठेवला असून पूर्ण महाराष्ट्रभर दौरे करत आहेत.

# शिवगर्जना गणेश मंडळाचे विविध सामाजिक उपक्रम

## शिवगर्जना गणेश मंडळ आयोजित रक्तदान शिबिरात ४८ गणेश भक्तांनी केले रक्तदान

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

येथील शिवगर्जना गणेश मंडळ विविध सामाजिक उपक्रम घेऊन गणेश उत्सव साजरा करतो दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शिवगर्जना गणेश मंडळ कसबा विभाग शिनगारे गल्ली येथे रक्तदान हेच श्रेष्ठ दान या युक्तीप्रमाणे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत ४८ गणेश भक्तांनी रक्तदान केले. धारूर येथील शिवगर्जना गणेश मंडळांमध्ये दरवर्षी नाविन्यपूर्ण यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात येते यावर्षी देखील रक्तदान शिबिर, धारूर शहरातील सर्व महापुरुषांचे चौक आणि

इतर ऐतिहासिक चौकांची स्वच्छता आणि पुष्पहार अर्पण सोहळा, जनजागृती रॅली,



रांगोळी स्पर्धा, वृक्षारोपण, समाज प्रबोधन पर कार्यक्रम आणि भव्य दिव्य असे आरोग्य शिबिर असे विविध सामाजिक उपक्रम राबवत येणार आहे. ११ सप्टेंबर बुधवार रोजी भव्य रक्तदान शिबिरचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्धाटक तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शहाजी लोमटे तर यावेळी डॉ. राम शिनगारे डॉ. भागवत शिनगारे, डॉ. संजय पुजदेकर, डॉ. अरविंद निकते, धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास बाधमोडे, सुरेश गवळी, सादिक इनामदार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्री गणेशाची आरती नितीन शिनगारे यांच्या हस्ते पार पडली.

# परळी विद्युत केंद्रात नवीन संचाची उभारणी होणारच ; त्यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू–धनंजय मुंडे


## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची यासंदर्भात घेणार भेट

मुंबई ।प्रतिनिधी

मराठवाड्याचे भूषण व परळीची अर्थवाहिनी असलेल्या परळी तालुक्यातील नवीन औष्णिक विद्युत केंद्रात नविन संच क्रमांक ९ हा यापूर्वीच मंजूर झालेला आहे . या संचाची उभारणी रद्द होणार नाही ,हा संच उभारावा यासाठी आपण शर्तीचे प्रयत्न करणार आहोत. असे राज्याचे कृषीमंत्री मंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. ते पुढे म्हणाले की, संच क्रमांक नऊ उभारण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध असून हा संच उभारणीस मान्यता देण्यात यावी, अशी मागणी आपण उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली असून यासंदर्भात लवकरच श्री फडणवीस यांची भेट घेणार आहेत.

मागील छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती. याबाबत महानिर्मितीने केलेल्या सर्वेक्षणानंतर पाणी, कोळसा इत्यादी गोष्टींची उपलब्धता नाही असा अभिप्राय महानिर्मितीच्या स्थानिक प्रशासनाने राज्य शासनास सादर केल्यामुळे नव्या संचाच्या





उभारणीस अडचणी निर्माण होतील अशी शंका निर्माण झाली आहे.

मात्र परळी येथील औष्णिक विद्युत केंद्रात पासून जवळ असलेल्या खडका बंधाऱ्यांमध्ये माजलगाव धरण व जायकवाडी धरण येथून पाण्याची कमतरता भासल्यास पाण्याचे आवर्तन घेता येते आणि असा प्रसंग पाच ते सहा वर्षात कधीतरी एखाद्यावेळी येतो मात्र पाण्याची कमी भासत नाही.त्याचबरोबर नाशिक, भुसावळ, पारस ही औष्णिक केंद्र देखील कोळसा खानीपासून दूरच आहेत, मात्र इलेक्ट्रिक रेल्वेमुळे तिथे कोळसा लवकर पोहोचतो त्याच पद्धतीने परळीत देखील डबल ट्रॅक चे काम सुरू असून परळीत देखील रेल्वेने कोळसा पोहोचण्यास कोणतीही अडचण नाही. त्याचबरोबर परळी येथे औष्णिक विद्युत केंद्रात नवीन प्रकल्प उभारण्यासाठी वेगळी जागा विकत घेण्याची गरज नाही तसेच मनुष्यबळ उपलब्धी व कर्मचाऱ्यांच्या वसाहती हे देखील औष्णिक विद्युत केंद्र परिसरातच असल्याने त्या देखील जमेच्या बाजू असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

# हाफिज़ मुहम्मद जुनैद यांची जमीयत उलमा-ए-हिंद (अरशद मदनी) च्या शहराध्यक्षपदी सहाव्यांदा बिनविरोध निवड

बीड (प्रतिनिधी)

शहरातील हाफ़िज़ मुहम्मद जुनैद हाफ़िज़ मुहम्मद नसीर यांची जमीयत उलमा-ए-हिंद अरशद मदनी गटाच्या बीड शहराध्यक्षपदी सहाव्यांदा बिनविरोध निवड करण्यात आल्याने त्यांच्यावर समाजातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हाफ़िज़ मुहम्मद जुनैद यांना सर्वप्रथम जमियत उलमा-ए-हिंद अरशद मदनी गटाने कारंजा झोनचे अध्यक्ष म्हणून संधी दिली होती. या पदावर राहून त्यांनी उत्कृष्ट संघटन आणि आपल्या कामाच्या बळावर चांगले कार्य केल्याने याची नोंद घेत त्यांना पहिल्यांदा सन २०१२ साली प्रभारी बीड शहराध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली होती नंतर या पदावर सुद्धा त्यांचे उत्कृष्ट कार्य पाहून तेव्हापासून आतापर्यंत दर २ वर्षांनी होणाऱ्या निवडीमध्ये त्यांची यंदा दिनांक ७ सप्टेंबर २०२४ रोजी सहाव्यांदा बीड शहराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या पदावर लागोपाठ १२ वर्षांपासून सातत्याने निवडून येणारे हाफ़िज़ मुहम्मद जुनैद हे पहिलेच पदाधिकारी आहेत. यामागे ते गेल्या १२ वर्षांपासून जमियतसाठी करत असलेले अविरत कार्य तसेच वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची साथ आणि सहकार्य यामुळे त्यांची सहाव्यांदा बीड शहराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यामुळे जमियतचे वरिष्ठ आणि



कनिष्ठ पदाधिकाऱ्यांसह समाजातील सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून यापुढेही ते अशाच प्रकारे आपले कर्तव्य उत्कृष्ट तऱ्हेने पार पाडतील अशा सदिच्छा व्यक्त होत असून मोठ्या प्रमाणात शुभेच्छा देण्यात येत आहे.

## विमा एक रुपयाचा आणि क्लेम करायला दोनशे रुपये

# शेतकऱ्यांची होते आर्थिक लूट कृषीमंत्री यांनी लक्ष देण्याची गरज

माजलगाव |सुनील थोरात

सविस्तर माहिती अशी की शासनाने शेतकऱ्यांकडून एक रुपयाचा विमा भरून घेतला पण नंतर कंपनीने पाहणी करण्याच्या नावाखाली व क्लेम करण्याच्या नावाखाली दोनशे रुपये घेऊन आर्थिक लूट चालू केलेली आहे. यामुळे शेतकरी वैतागलेले आहेत आधीच पावसाने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे आणि दुसरीकडे कंपन्या विमा च्या नावाखाली शेतकऱ्यांकडून लूट करत आहेत कृषी मंत्री यांनी सदर प्रकार लक्षात घेऊन शेतकऱ्यांची लूट थांबवावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.जर एखाद्या शेतकऱ्यांकडे खाते फोड केलेली असेल आणि त्याचे दहा फॉर्म असतील तर त्याला दोन हजार रुपये द्यावे लागतात. शेतकऱ्यांना ठेकेदाराकडून लुटीचा प्रकार उघड कीस......आमच्या प्रतिनिधींनी याबाबत कृषी अधिकारी यांना फोन द्वारे विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की




आम्ही कोणत्याही लोकांची नियुक्ती केलेले नाही आणि कोणालाही पैसे देऊ नका. आज जे विमा फॉर्म भरून घेतात त्यांना कंपनीचे नाव विचारल्यास नावही सांगता येईना मग शेतकऱ्यांना प्रश्न पडतो की हे कंपनीचेच माणस आहेत का इतर कोणी? कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी हे पंचनामे करताना हजर असणे आवश्यक.......शेतकऱ्यांच्या शेतात झालेल्या नुकसानीचे पंचनामे विमा कंपनीकडून करत असताना ते पंचनामे कृषी कार्यालयाचे अधिकारी मंडळाधिकारी तलाठी यांच्या उपस्थितीत होणे आवश्यक आहे. असे शेतकरी यांचे म्हणणे आहे. परंतु विमा कंपनीकडून ठेकेदार नियुक्त करून त्या ठेकेदारांनी काही मुले कामाला ठेवून त्यांच्यामार्फत फॉर्म भरून घेण्याचा घाट घातला असल्याने शेतकऱ्यांची लूट होत आहे. शेतकऱ्यांना पैशाची मागणी करणाऱ्या विमा कंपनी कर्मचाऱ्यांना बुटाने वाजवा.

# कन्हैयानगरला जाळपोळ, तिघांना अटक:अजून ५७ जण आहेत पोलिसांच्या रडारवर, ६० जणांवर गुन्हे दाखल

जालना / प्रतिनिधी

एका महिलेला हॉटेलवर बोलविल्याच्या कारणावरुन पाच जणांनी टिकास, कोयत्याने वार करुन जामवाडीजवळील चिरंजीव हॉटेलमध्ये शेख हफीज हबीब शेख (कन्हैयानगर, जालना) याची हत्या केली. पोलिसांनी त्याच दिवशी काही आरोपींना अटक केली. परंतु, एका जमावाने पोलिसांना घेराव घालून ठेवत काही जणांनी जाळपोळ, दगडफेक करीत जालना शहरातील कन्हैयानगर भागातील नागरिकांना वेठीस धरले. दगडफेक करणाऱ्यांना पकडण्यासाठी जात असताना काही जणांनी पोलिसांना जाऊ दिले नाही. यामुळे पोलिसांनी ओळखीच्या ११ जणांसह ६० जणांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. व्हिडीओ रेकॉर्डींगव्दारे, सीसीटीव्हीद्वारे जाळपोळ करणाऱ्यांचा पोलिस शोध घेत आहे.

जालना जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून खुनाच्या घटनांचे सत्र सुरु आहे. अनैतिक संबध, मालमत्ता, कौटूंबिक, शेती वादातून सातत्याने खुनाच्या घटना होत आहेत. वैयक्तीक वादातून या घटना होतात. परंतू, या घटनांच्या आडून कायद्याला न जुमानता जाळपोळ, दगडफेक, पोलिसांशी काहीजण अरेरावी करीत असतात. अशा घटनांमुळे दंगल होण्याचीही शक्यता असते. यामुळे पोलिस शक्यतो, जमावाला शांत राहण्याचे आवाहन करतात. दरम्यान, महिलेला हॉटेलमध्ये बोलविण्याच्या कारणातून पाच जणांनी जामवाडी येथील चिरंजीव हॉटेलमधील एका खोलीत खून करण्यात आला आहे. मारेकरी व मयत हे दोघेही जालना शहरातील कन्हैयानगर भागातील रहीवाशी आहेत. खुन झाल्याची माहिती मिळताच पोलिस कन्हैयानगर येथे दाखल झाले. जमाव आक्रमक झाल्याने पोलिसांनी शांत राहण्याचे आवाहन केले. परंतू, यात काही जणांनी पोलिसांना घेराव घालून रोखले. तर दुसऱ्या बाजूंच्या उभ्या असलेल्या काही जणांनी संजय शेळके उर्फ शर्मा याच्या घरासह परिसरातील घरांवर दगडफेक सुरु केली तर काहींनी गल्लीत उभ्या असलेल्या वाहनांना आग लावली. जाळपोळ वाढत असल्यामुळे जास्त पोलिस व अधिकारी आल्यानंतर जमाव पांगला. यानंतर पोलिसांनी जळालेली वाहनांची आग विझवली. यात एक घर जाळण्यात



आले असून, ईतर तीन घरांवर दगडफेक करण्यात आली आहे. या घटनेमुळे रात्रभर या परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणात शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी, जाळपोळ, दगडफेक यानुसार पोलिस नाईक अभिजीत वायकोस यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अरबाज खॉन जावेद खॉन, आदीक शेख, शाहरुख शेख, ईम्रान (पूर्ण नाव माहित नाही), लड्डु , अरबाज खैरु, शेख आसेफ, शेख इरफान, शेख कलीम, शेख अलीम (पूर्ण नाव माहित नाही) यांच्यासह अन्य ६० जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जे कन्हैयानगर भागातून फरार झाले. दरम्यान, शेख हफीज हबीब शेख खून प्रकरणी ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तीन घरांवर दगडफेक ज्याने खून केला त्याचे घर जाळण्यात आले असून, इतर तीन घरांवर दगडफेक करण्यात आली आहे. काही वाहनांची तोडफोड करण्यात आली आहे. कुणीही कायदा हातात घेऊ नये म्हणून पोलिसांनी दगडफेक, तोडफोड करणाऱ्यांवर कडक कारवाई करणे सुरु केले आहे. या कलमांनुसार गुन्हे दाखल भारतीय न्याय संहीता बीएनएसनुसार ३२६ जी, ३२६ एफ, १९३ (३), १९१ (२), १९०, १८९ (२), १३२ या कलमान्वये जाळपोळ, दगडफेक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी धरपकड सुरू केल्यामुळे अनेकजण फरार झाले आहेत.

उर्वरितांनाही होणार अटक : दगडफेक, तोडफोड, जाळपोळ करणारे बहुतांश ओळखीचे आहेत. यामुळे गुन्हे दाखल करुन अटक करण्याचे कामे सुरू आहेत. आतापर्यंत तीन जणांना अटक करण्यात आली आहे. उर्वरितांनाही अटक करण्यात येत असल्याची माहिती तपास अधिकारी विठ्ठल शिंदे यांनी दिली आहे.

# वक्रतुंड गणेश मंडळाच्या वतीने घेतलेल्या नेत्र रोग शिबिरात ६२ रुग्णांची तपासणी

## आनंदरुषी रुग्णालयात होणार रुग्णांवर शस्त्रक्रिया

केज/प्रतिनिधी

वक्रतुंड गणेश मंडळ हे मागील१५ वर्षे सामाजिक आध्यत्मिक,वैज्ञानिक परंपरा जपत आलेली आहे.हे वक्रतुंड गणेश मंडळाचे १६ वे वर्ष आहे. याहीवर्षी आपली परंपरा जपून तुलसी रामायण कथा चालू आहे.दररोज दोन ते पाच रामकथा सोबत इतरही कार्यक्रम चालू असतात याचाच भाग म्हणून दि.११ सप्टेंबर बुधवार रोजी सकाळी १० ते २ नेत्र तपासणी शिबीर आयोजीत केले.यामध्ये डोळयांची तपासणी ६२ जणांनी करून घेतली तर ५ गरजूरुग्णांनाआनंदरुषी नेत्रालय अहिल्यानगर येथे शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

मागील वर्षी वक्रतुंड गणेश मंडळाच्या वतीने ऍक्युप्रेशर थेरेपी शिबीर घेण्यात आले होते सात दिवस घेतलेल्या या शिबिरात ४०० च्या वर रुग्णांनी लाभ घेतला होता. यावर्षी नेत्र तपासणी बुधवारी घेण्यात आली आहे तर दि १२ गुरुवारी दंत रोग तपासणी केली जाणार आहे. दृष्टीतज्ञ् निखिल सुरवसे यांनी तपासणी केली बुधवारी झालेल्या तपासणी शिबिरात ६२ जणांनी डोळे तपासून घेतले तर यातील ५ जणांना ऑपरेशन करणाऱ्यांसाठी नगर येथील आनंदरुषी रुग्णालयात मोफत ऑपरेशन केले जाणार आहे.



# जय किसान गणेश मंडळ आयोजित पशुरोग निदान शिबीरात २१०० जनावरांची तपासणी

## मान्यवरांच्या हस्ते उदघाटन करून पशु तपासणी शिबिरास सुरुवात केली

धारूर । प्रतिनिधी

जय किसान गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत (ता.११) रोजी सकाळी सात ते बारा या दरम्यान पशुधन आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात २१०० पशु ची तपासणी व आत्यावशक शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

येथील कसबा भागातील गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे (ता.११) रोजी आयोजित केलेल्या पशुरोग निदान शिबिरात २१०० पशुधनाची तपासणी व उपचार करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन प्रा.विजयकुमार शिनगारे व ऍड



परमेशवर शिनगारे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.चंबरें,डॉ शेजुळ व पशुधन पर्यवेक्षक.नखाते,पारवे,जयराम वायकर,घुले,लगसकर यांच्या सह कर्मचारी उपस्थित होते. सकाळी सात ते दुपारी बारा वाजेपर्यंत झालेल्या शिबिरात २१०० जनावरांची तपासणी करून उपचार करण्यात आले. दोन म्हशींवरील व एक बैलावर अत्यावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. जंतनाशक लस, गोचिड गोमाशा निर्मूलन लसीकरण, घटसर्प, फऱ्या रोग, शेळ्या मेंढ्यासाठी लसीकरण, वंध्यत्व तपासणी, गर्भतपासणी आदी लसीकरण व तपासण्या करण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयकिसान गणेश मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला

मंडळाच्या वतीने दुपारच्या सत्रात चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा दोन गटात आयोजित केली होती या स्पर्धेत ७० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.जय किसान गणेश मंडळाच्या वतीने उद्या दि.१२ गुरुवार रोजी मोफत आरोग्य शिबिराचे व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्यने सहभागी घेऊन लाभ घेण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.




# मुंबई येथे उपमुख्यमंत्री अजीत दादा व शेतकरी नेते रविकांत तुपकर यांची बैठक

मुंबई/प्रतिनिधी

मुंबईत मंत्रालयात शेतकरी नेते रविकांत भाऊ तुपकर यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.या बैठकीस सहकार मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील,पणन, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री श्री.अब्दुल सत्तार,शेतकरी नेते श्री. रविकांत तुपकर यांच्या सह नियोजन,वित्त, सहकार,मदत व पुनर्वसन, रोजगार हमी योजना, उद्योग,ऊर्जा विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाचे अध्यक्ष उपस्थित होते.या बैठकीत शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर सखोल चर्चा करण्यात आली आणि आवश्यक निर्णय घेण्यात आले.शेतकरी क्रांती मोर्चा संघटनेच्या वतीने राज्या तील पात्र शेतकरी आत्महत्याग्रस्तकुटुंबातील वारसांना १५लक्ष रुपयांची भरीव मदत देण्याची मागणी केली.

# ॲड. नरसिंह जाधव यांनी घेतली शरद पवारांची भेट; जोमाने कामाला लागण्याचे आदेश

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे इच्छुक उमेदवार ड. नरसिंह जाधव यांना मतदार संघातून जन सामान्यांची पसंती मिळत असल्याने शरद पवार साहेबांनी बारामतीला बोलावून घेऊन आणखी जोमाने काम सुरु ठेवण्याचे आदेश देत आर्शिवाद दिले आहेत. यावेळी ड. नरसिंह जाधव आपण गेल्या वर्ष भरात मतदार संघात केलेल्या संपर्क दौऱ्याचा अहवाल सादर केला.

आष्टी पाटोदा व शिरूर मतदार संघातून ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरद पवार विधी सेलचे उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रमुख यांनी बुधवार शरदचंद्रजी पवार साहेब यांची विद्या प्रतिष्ठान बारामती येथे भेट घेऊन आष्टी मतदार संघातील त्यांच्या मतदार गाव भेटी संदर्भामध्ये मतदारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासंदर्भामध्ये काय कल आहे. या संदर्भात माहिती दिली. तसेच आपल्या उमेदवारीचे जनतेत स्वागत होत असून, मतदारांत परिवर्तनाचे वारे असून, पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना उमेदवारीची संधी द्यावी अशी मागणी केली. यावेळी सोबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव हे देखील उपस्थित होते.

आष्टी मतदारसंघांमध्ये विधानसभेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये आदरणीय शरदचंद्रजी पवार पक्षाच्या वतीने ड. नरसिंह जाधव यांना उमेदवारी देण्यासंदर्भामध्ये शरदचंद्रजी पवार साहेब तसेच संसदरत्न खा. सुप्रिया सुळे यांची देखील भेट घेऊन आजपर्यंत केलेला कामाचा सर्व आढावा पक्ष श्रेष्टीकडे ड. नरसिंह जाधव व शिवभूषण जाधव यांनी सादर केला. तसेच मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील वकील संघ व आष्टी, पाटोदा, शिरूर, येथील



वकील संघातील वकिलांनी ड. नरसिंह जाधव यांना उमेदवारी द्यावी अशी शिफारस पत्र देखील शरदचंद्रजी पवार सादर केले.

# बोंबला.. माजलगाव तहसील कार्यालयात पिण्याचे, पाणी स्वच्छतागृहच नाही

## अपंग, वयोवृद्ध, गर्भवती महिला यांची हेळसांड थांबवावी.. भाई ड.नारायण गोले पाटील

तालखेड/प्रतिनिधी

माजलगावं तालुक्याच्या सर्व कार्यालयाचे वरिष्ठ कार्यालय म्हणून तहसील कार्यालयाकडे पाहिले जाते, मात्र माजलगाव तहसील कार्यालयात हजारो नागरिक दररोज उंबरे झिजवत असताना तहसील कार्यालयात कुठलेच काम होत नाही याशिवाय वयोवृद्ध नागरिक अपंग आणि गर्भवती महिला हे देखील संजय गांधी निराधार इंदिरा गांधी निराधार योजनेच्या विविध कामासाठी तहसील कार्यालयाचे उंबरे झिजवत असताना तहसील कार्यालयात दिवस ठाण मांडून बसतात पण तहसीलदार यांना त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावीशी वाटली नाही याशिवाय मुतारी संडास बाथरूम यांचा अभाव तहसील कार्यालयात असल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून तहसीलदार यांनी १७ सप्टेंबर पूर्वी तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी महिलांसाठी अपंगासाठी, वयोवृद्धांसाठी ,पुरुषांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी याशिवाय तहसील कार्यालयात चाललेली अधिकारी कर्मचारी यांची मनमानी थांबवावी तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यालय वास्तव्यास थांबावे, तसेच तहसील कार्यालयात चाललेला भ्रष्टाचार थांबवून सामान्य नागरिकाची कोळंबून पडलेली कामे त्वरित करण्यात यावीत आदी मागण्याचे दहा सप्टेंबर रोजी तहसीलदार माजलगाव यांना निवेदन दिले यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी तहसीलदार यांनी वृद्ध अपंग व गर्भवती महिला यांच्यासह नागरिकांची हेळसांड थांबवावी अन्यथा १७ सप्टेंबर पासून तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला असून या निवेदनावर शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई ड नारायण गोले पाटील,तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ तालुका सह चिटणीस भाई राहुल सोळंके, भाई सतीश शेजुळ पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी भाई चांगदेव शेजुळ भाई आनंत चव्हाण, भाई विष्णू शेळके भाई सुदाम चव्हाण भाई गोविंद घाटूळ भाई माऊली चंदनशिव आदींच्या स्वाक्षरी आहेत



# लिंबागणेशमध्ये मयुरेश्वराची विसर्जन मिरवणूक राजेशाही थाटात :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- एक गाव एक गणपतीची २५० वर्षाची परंपरा असलेल्या बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील सरकार वाड्यात प्रतिष्ठापित करण्यात आलेल्या मयुरेश्वर गणेशाची आज दि.१२ गुरुवार रोजी दुपारी १ वाजता सामुदायिक आरतीनंतर मुर्ती सागवानी पालखीत ठेऊन सरकारवाडा येथून छत्री,अब्दागिरी,ध्वज, दंड अशा राजेशाही थाटात विसर्जन

मिरवणुकीला सुरुवात झाली. सरकार वाड्याच्या बाहेर आल्यानंतर टाळ मृदंगाच्या गजरात भजनी मंडळींनी ठेका धरला तर ढोल ताशांच्या गजरात लेझीम पथकातील तरूणांनी आपले कसब दाखवले.

पालखी समोर धोतराच्या पायघड्या अंथरूण स्वागत करण्याचा मान परीट समाज बांधवांचा असतो. गावातील मारोती मंदिराला प्रदक्षिणा घातल्यानंतर कैकाडवाड्यात सजवलेल्या बैलगाडीत मयुरेश्वराची मुर्ती पंचक्रोशीतील गणेशभक्तांच्या




दर्शनासाठी ठेवण्यात आली. १२ वाड्यातील लेझीम पथके यांनी सहभाग घेतला होता. सायंकाळी ७ वाजता पुन्हा तेथून मयुरेश्वराच्या विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होणार असुन रात्री ९ वाजता भालचंद्र गणपती मंदिराच्या चंद्रपुष्करणी तिर्थात महाआरती नंतर विसर्जन होणार आहे. दरम्यान गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नेकनुर पोलिस ठाण्याच्या वतीने कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

राजकीय मातब्बरांनी पालखीला खांदा देत मनोभावे घेतले दर्शन

लिंबागणेश येथील मयुरेश्वर गणेशाच्या विसर्जन मिरवणूकच्या पार्श्वभूमीवर आ.संदिप क्षीरसागर, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, योगेश क्षीरसागर यांनी लिंबागणेश येथे भेट देत मयुरेश्वराचे मनोभावे दर्शन घेऊन पालखीला खांदा दिला.

## हुश्श उलघडा झाला


# अखेर ड्रोन उडवणारे तरुण सापडले! पोलिसांनी घेतलं दोघांना ताब्यात

# भारत सर्वांगीण या कंपनीकडून रस्त्याच्या सर्वेसाठी ड्रोन उडवले जात असल्याची पोलिसांकडून माहिती!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विविध भागामध्ये ड्रोनने घिरट्या घातल्याच्या घटना घडत आहेत. जालनामध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या गावात ड्रोन फिरत असल्याचे समोर आल्यानंतर या चर्चा समोर आल्या होत्या. त्यानंतर ग्रामीण भागात अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळी ड्रोन फिरत असल्याची प्रकरणे उघडकीस आली होती.

बीड जालनासह सांगली, सातारा, बारामती, सोलापूर जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळी ड्रोन फिरत असल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण पसरले होते. अशातच आता सांगलीमध्ये रात्रीच्या वेळी ड्रोन उडवणाऱ्या दोघांना नागरिकांनी ताब्यात घेत पोलिसांच्या हवाली केले. यावेळी चौकशीत वेगळेच कारण समोर आले आहे.



याबाबत समोर आलेल्या माहितीनुसार, गेल्या अनेक दिवसापासून सांगली जिल्ह्यातील काही भागात रात्रीच्या उडणाऱ्या ड्रोनमुळे लोकांमध्ये मोठी दहशत पसरली होती. अनेक ठिकाणी चोरीचे प्रकार ही घडल्याने ग्रामस्थ भयभीत होते. तर रात्रीचे ड्रोन उडवून चोऱ्या होत असल्याचे लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. गेल्या काही दिवसापासून पोलिस याचा शोध घेत होते. ही ड्रोन उडवणारी टोळी शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते.

बुधवारी (ता. ११ सप्टेंबर) दुपारी खानापूर तालुक्यातील माहुली येथे काही व्यक्ती ड्रोन उडवताना तेथील लोकांच्या निदर्शनास आले. या लोकांनी त्यांना तातडीने पकडून या ड्रोनबाबत विचारणा केली व त्यांना विटा पोलिसांच्या ताब्यात दिले. यावेळी पोलिसांनी केलेल्या चौकशीमध्ये भारत सर्वांगीण या कंपनीतर्फे रस्त्याचा सर्वेसाठी ड्रोन उडवले जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**रात्रीचे ड्रोन आकाशात उडत आहेत. याची तक्रार अनेक ठिकाणाहून पोलीस स्टेशन मध्ये येत आहे. काल असाच ड्रोन उडत असल्याचा प्रकार समोर आला होता. ग्रामस्थांनी त्याला विचारपूस करत आमच्या स्वाधीन केले आहे. पण भारत सर्वांगीण या कंपनीतर्फे रस्त्याचा सर्वे साठी ड्रोन उडवले जात असल्याचा निष्पन्न झाले आहे, अशी माहिती विटाचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे यांनी दिली आहे.**

**दरम्यान, ग्रामीण भागांमध्ये अशाप्रकारे ड्रोन फिरत असल्याने गावकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. ड्रोनच्या माध्यमातून टेहळणी करत रात्री दरोडा टाकतात, अशाही अफवा पसरल्या आहेत. तसेच काही ठिकाणी चोरीच्याही घटना घडल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. अशातच आता सांगलीमध्ये सापडलेल्या या ड्रोन प्रकरणामध्ये वेगळेच कारण समोर आले आहे.**

# संपादक शेख तय्यब भाई ठरतील सर्वसामान्य जनतेच्या मनातील जीवाभावाचे आमदार

## बीड विधानसभा मतदारसंघातून तय्यब भाईंनाच उमेदवारी द्यावी - सय्यद फैय्याज इनामदार

बीड (प्रतिनिधी)

सायं. दैनिक बीड रिपोर्टर चे संपादक शेख तय्यब भाई यांनाच बीड विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी द्यावी अशी मागणी तरुण तडफदार सामाजिक कार्यकर्ते सय्यद फैय्याज इनामदार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली असून तय्यब भाई हे सर्वसामान्य जनतेच्या मनातील जीवाभावाचे आमदार ठरतील असेही म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, गेल्या ३०-३५ वर्षांपासून तय्यब भाई पत्रकारीता क्षेत्रात कार्यरत आहेत. यामुळे सर्वसामान्य गोरगरीब माणसांपासून ते सधन लोकांपर्यंत सर्वांना त्यांचा चांगला परिचय आहे. त्यांनी स्वतः अत्यंत गरीब परिस्थितीतून नागापूर सारख्या एका छोट्याशा खेड्यातून निघून आपल्या कार्यकर्तृत्वाने पत्रकारिता क्षेत्रात मोठे नावलौकिक मिळविले आहे. शिवाय प्रत्येकाच्या सुख दुःखात धावून जाण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे त्यांनी अनेकांच्या मनात मानाचे स्थान मिळवले आहे. त्यांचे प्रत्येक पक्ष व कार्यकर्त्यांशी चांगले संबंध आहेत. आजपर्यंत ते कोरे आणि करकरीत व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. इतरांसारखे त्यांच्यावर आजपर्यंत कधीही आणि कोणत्याही भ्रष्टाचाराचे डाग लागलेले नाही. शिवाय बीड पासून मुंबई पर्यंत प्रत्येक पक्षाचे वरिष्ठ आणि कनिष्ठ नेत्यांसोबतच कार्यकर्तेही त्यांना चांगले ओळखतात. स्थानिक पातळीवरील कर्मचारी





अधिकाऱ्यांपासून ते मुंबई पर्यंतच्या अधिकाऱ्यांपर्यंत त्यांचे संबंध आहेत. त्यांच्या शब्दालाही मान आहे. त्यांच्या रिपोर्टर भवन येथील कार्यालयात बसून ते अनेकांचे विविध प्रश्न फक्त फोन करून मार्गी लावतात. अनेकांच्या कार्यक्रमात सुख दुःखात ते जातीने उपस्थित राहतात. असे व्यक्तिमत्व बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार झाले तर निश्चितपणे बीड मतदार संघाचा कायापालट होण्यास वेळ लागणार नाही. चांगले काम करण्याची धमक त्यांच्यात आहे. यामुळे तय्यबभाई सारख्या उमद्या व्यक्तिमत्वालाच उमेदवारी द्यावी. तय्यब भाई निश्चितपणे जनतेच्या मनातील जीवाभावाचे आमदार ठरतील. असा विश्वासही तरुण तडफदार सामाजिक कार्यकर्ते सय्यद फैय्याज इनामदार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केला आहे.

# २९ सप्टेंबर रोजी बीडमध्ये मराठवाडा केसरी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन - राजेंद्र मस्के

बीड (प्रतिनिधी)

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने दिनांक २९ सप्टेंबर रविवार रोजी बीडमध्ये मराठवाडा केसरी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले आहे. मागील शर्यती दरम्यान घोषणा केल्या प्रमाणे सोनालीका ट्रॅक्टर पहिले बक्षीस ठेवण्यात आले आहे. बैलगाडा शर्यत शौकीन शेतकरी बांधवांनी रीतसर नाव नोंदणी करून, या शर्यतीत बहुसंखेने सहभाग घ्यावा. असे आवाहन शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी केले आहे.



बैलगाडा शर्यत महाराष्ट्रातील पारंपारिक हौसी खेळ आहे. गावोगावी सन उत्सव किंवा विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने शेतकरी बांधवाना प्रोत्साहित करण्यासाठी बैलगाडा शर्यतीचे अनेक गावात नियोजन केले जाते. बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील खेडोपाडी बैलगाडी शर्यत लोकप्रिय झाली. हौसी शेतकऱ्यांसाठी यापूर्वी दोन वेळा राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. उदंड प्रतिसाद लक्षात घेऊन याही वर्षी भव्य बैलगाडा शर्यतीचे भव्य बक्षीसासह आयोजन केले आहे. बीड शहरालगत बीड - अहमदनगर हायवे, तळेगाव शिवारात या स्पर्धा संपन्न होतील. प्रथम बक्षीस सोनालिका ट्रॅक्टरसह अन्य रोख बक्षिसे देण्यात येतील. नोंदणीकृत स्पर्धकांनाच शर्यतीत सहभाग घेता येईल. संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय, बीड येथे नाव नोंदणी सुरु आहे. अशी माहिती राजेंद्र मस्के मित्र मंडळाने कळवली आहे.

## जाहीर प्रगटन

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का, यांच्या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये दाखल जन्म मृत्यू प्रकरण मध्ये नोंद घेणे बाबत

ज्या अधी अर्जदार,शहादेव राधाकिसन हे जाधव, रा. आर्वी, ता. शिरूर कासार, जि. बीड यांनी स्वतःचे वडील नामे राधाकिसन यदू जाधव यांचा मृत्यू आर्वी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे दिनांक २२.०९.२०१३ रोजी झाल्याची नोंद करणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे.

त्या आधी या दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वतः किंवा आपले वकिला मार्फत हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून अनांची सूनावणी घेउन नियमाप्रमाणे आदेश केला जाईल.

**स्वाक्षरीत / -**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर कासार**

# प्रलंबित जात पडताळणी प्रस्ताव तत्काळ मार्गी लावा नसता तीव्र आंदोलन छेडू - गणेश बजगुडे पाटील

बीड (प्रतिनिधी)

जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी जाणीवपुर्वक उशिर केला जात असल्याचा आरोप करत आज बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती संघटनेच्या वतीने गणेश बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी बीड यांची भेट घेत निवेदन देण्यात आले.

यावेळी गणेश बजगुडे पाटील म्हणाले की, जात पडताळणी प्रस्ताव दाखल केल्यापासुन जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत निकाली काढून संबंधितांना प्रमाणपत्र दिले पाहिजे परंतु याठिकाणी जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे. सध्या विद्यार्थ्यांचा ऍडमिशन कालावधी सुरु



असुन जात पडताळणी प्रमाणपत्र न मिळाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होवु शकते. विशेषतः अनेक महिने उलटुन देखील काही विद्यार्थी पालक वारंवार चकरा मारत आहेत त्यांना समाधान कारक उत्तर दिले जात नाही. विशेषतः डएइउ व कुणबी (ओबीसी) प्रमाणपत्र देण्यासाठी उशीर होत असल्याचे निदर्शनास येत आहे तरी आपण स्वतः याकडे लक्ष देवुन एक महिन्याच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याचे आदेश द्यावेत व मागील प्रलंबित सर्व प्रकरणे तत्काळ निकाली काढावीत नसता बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती विद्यार्थी परिषदेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे शिवक्रांती संघटनेचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी दिला. यावेळी इंटक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, जिल्हा सचिव सखाराम बेडगे, तालुका सचिव शेख अर्शद, शिवक्रांती विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष ओमकार पाटील, सुदर्शन शिंदे आदी उपस्थित होते.

# मुरूम टाकण्याच्या नावाखाली लूट

पेठ बीड प्रतिनिधी /जावेद पठाण

पेठ बीड विभागातील तेलगाव नाका ईदगाह नगर येथील जनतेची रस्त्यावर मुरूम टाकण्याच्या नावाखाली लूट होत आहे,सध्या सगळी कडील रस्त्याचे प्रश्न उदभव्त आहे सगळी कडे चिखल होत आहे म्हणून प्रशासनाकडून मुरूम टाकण्यात येत आहे,मुरूम टाकण्यासाठी लोकांकडून १००-२०० रुपये जमा करण्यात येत आहे लोकांना चिखलाचा त्रास होत आहे म्हणून लोकांपशी दुसरा पर्याय नाही म्हणून लोक या लूट मुळे त्रस्त आहे तरी पण प्रशासनाने योग्यते कारवाही करावी नाही तर कायदेशीर आंदोलन करण्यात येईल.अशी दीलावर नगर येथील समाजसेवक शेख अब्बास यांची मागणी आहे



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT